ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# भारताचे परराष्ट्रीय धोरण

**डॉ. कल्पना आर. टेकाडे**

*सहयोगी प्राध्यापक*
*राज्यशास्त्र विभागप्रमुख*
*डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर*

**प्रास्ताविक:**

भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची स्थूलमानाने सुरुवात हि स्वातंत्र्यपूर्व काळातच झाली. भारताने आंतरराष्ट्रीय प्रश्नांसंबंधी वेळोवेळी स्वीकारलेल्या धोरणातूनच ते उत्क्रांत झाल्याचे दिसून येते. हे बऱ्याच अंशी त्याच्या राजकीय अनुभवातून साकारले आहे. स्वातंत्र्यापूर्वीच भारताने आंतरराष्ट्रीय प्रश्नांसंबंधी अनेक ठराव संमत केलेले होते. सन १८८५ मध्ये ब्रह्मदेश इंग्रजांनी जिंकल्याबद्दल निषेध व्यक्त करण्यात आला. सन १८९२ मध्ये ब्रिटिशांच्या साम्राज्यावादी कारवायांसाठी भारतास तळ म्हणून वापरण्यास विरोध करण्यात आला.

भारतीय नेत्यांचा साम्राज्यवादाचा अनुभव हा पाश्चिमात्य देशांपुरताच मर्यादित असल्याने साम्राज्यवादाचा संबंध त्यांनी फक्त पाश्चात्य देशांशी लावणे समजू शकते. स्वातंत्र्योत्तर काळात, प्रामुख्याने संयुक्त राष्ट्रांत ठराव संमत करून घेऊन, इंडोनेशिया, ट्युनिशिया, मोरोक्को, अल्जीरिया इ. आफ्रिकी आशियाई देशांच्या मुक्तीसाठी वातावरण तयार करण्यात भारताने उल्लेखनीय कामगिरी बजाविली. या भूमिकेतूनच १९५६ मध्ये इंग्लंड व फ्रान्स यांनी सुएझ कालव्यासंबंधी केलेल्या सैनिकी हस्तक्षेपास भारताने विरोध केला. नेहरूंचे चरित्रकार मायकेल ब्रेशर यांच्या मते नेहरू हे भारतीय परराष्ट्रीय धोरणाचे शिल्पकार होत. इतकेच नव्हे, तर परराष्ट्रीय धोरण ही त्यांची मक्तेदारी होती. एका अर्थाने हे खरे आहे. भारताने १९२८ मध्ये परराष्ट्रीय धोरणासाठी स्वतंत्र विभाग सुरू केला. त्यासाठी एक समिती बनवली परंतु मंत्रिमंडळातील इतर कोणीही परराष्ट्रीय धोरणात फारसा रस घेतला नाही. पाकिस्तानसंबंधीच्या धोरणाविषयी मात्र कधीकधी मतभेद व्यक्त होत.

भारतातील लक्षणीय मुस्लिम लोकसंख्या, त्यांच्या धार्मिक निष्ठा आणि खनिज तेलाविषयी भारताचे परावलंबित्व लक्षात घेता, मध्य आशियात भारताने अरब देशांस अनुकूल धोरण स्वीकारले यात नवल नाही. धोरणाचे समर्थन करण्यासाठी कितीही मोठमोठी तत्त्वे सांगितली, तरी अखेरीस देशहिताच्या दृष्टीतूनच परराष्ट्रीय धोरण ठरवावे लागते, असे नेहरूंनी म्हटले आहे. ताश्कंद करार वा सिमला करार यांसारख्या महत्त्वाच्या वाटाघाटी तत्कालीन पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालीच झाल्या. परराष्ट्रीय धोरणाची समीक्षा करण्यात मंत्रिमंडळाने आणि संसदेने या काळात जास्त भाग घेतला. जनता पक्षानेही खरी खुरी अलिप्तता हेच आपले धोरण राहील, असे जाहीर केले आहे. ढोबळमानाने अलिप्तता याचा अर्थ कोणत्याही सैनिकी गटात सामील न होता, प्रत्येक आंतरराष्ट्रीय प्रश्नावर स्वतंत्रपणे निर्णय घेणे, असा केला जातो. शीतयुद्धाच्या काळात अनेक प्रसंगी (उदा., कोरियन युद्ध, इंडोचायना संघर्ष, सुएझचा पेचप्रसंग) भारताने दोन्ही पक्षांत समझोता घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतला. हे धोरण अंमलात आणण्यासाठी अलिप्त राष्ट्रांच्या परिषदा घेऊन त्यांतून आंतरराष्ट्रीय राजकारणात व संयुक्त राष्ट्रांत एक तिसरी शक्ती निर्माण करण्यात भारताचा हातभार लागला. अशा परिषदा बेलग्रेड (१९६१), कैरो (१९६४), लूसाका (१९७०), अल्जिअर्स (१९७३) आणि कोलंबो (१९७६) येथे भरविण्यात आल्या.

काश्मीरसंबंधी कडू अनुभव आल्यावर भारताने आपले द्विराष्ट्रीय प्रश्न स्वतः होऊन संयुक्त राष्ट्रांकडे नेले नाहीत. एवढेच नव्हे, तर स्वतःच्या द्विराष्ट्रीय प्रश्नांबाबत संयुक्त राष्ट्राच्या हस्तक्षेपास विरोध दर्शविला आहे. स्वहितास हानिकारक वाटणारे संयुक्त राष्ट्रांचे ठराव (उदा., आण्विक प्रसारबंदी ठराव) फेटाळून लावण्यात संकोच केला नाही. आपल्या धोरणाचे एक साधन या दृष्टीनेच भारताने संयुक्त राष्ट्रांकडे पाहिले आहे. कष्टाने मिळविलेल्या स्वातंत्र्याचा गटस्थ होण्याने संकोच होतो, असे भारताप्रमाणे अनेक आफ्रिकी-आशियाई देशांना वाटल्यामुळे त्यांनीही या धोरणाचा स्वीकार केला. भारताच्या धोरणावर टिपण करतांनी राजदूत के.एम. पन्नीकर लिहितात, “तो आपल्यासाठी स्वतंत्रतेची स्थिती निर्माण करण्यात यशस्वी झाला आहे, तसेच या धोरणानुसार चालणाऱ्या इतर देशांचे सहाय्य आणि

त्यांच्या मदतीने आंतरराष्ट्रीय शांततेसाठी योग्य प्रभाव टाकण्यात यशस्वी राहिला आहे." खरे अलिप्त राष्ट्र कोणते हे ठरविण्यासाठी अलिप्त परिषदांनी एक पंचसूत्री स्वीकारली आहे.

**भारतीय परराष्ट्र धोरणाची पंचसूत्री:-**

1. शांततामय सहजीवनाच्या तत्वावर आधारलेले स्वतंत्र धोरण आखणारे.
2. वसाहतींच्या मुक्तिसंग्रामास पाठिंबा देणारे.
3. कोणत्याही शीतयुद्धाशी संबंधित सैनिकी गटाचा सदस्य नसणारे.
4. पूर्व-पश्चिम संघर्षास चालना देणारा कोणताही लष्करी करार बड्या राष्ट्रांशी न करणारे.
5. स्वतःच्या भूप्रदेशावर परदेशास सैनिकी तळ उभारू न देणारे.

अशा राष्ट्रस या परिषदांत सामील करून घेण्यात येते. सर्वच बाबतीत हे नियम काटेकोरपणे पाळले जातात असे नाही. अलिप्ततेच्या या संकल्पनेविषयी अनेक प्रश्न निर्माण होतात. कारण प्रत्यक देश हा तेथील परिस्थिती बघून निर्णय घेत असतो.

**परराष्ट्र धोरण म्हणजे काय?**

परराष्ट्र धोरणाची संकल्पना स्पष्ट करातांनी मत वेगवेगळे असले तरी त्यांचात एक गोष्ट सारखी आहे ती म्हणजे परराष्ट्र धोरणामध्ये एका राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्राशी किंवा राष्ट्र समूहाशी असलेल्या व्यवहाराशी संबंध येतो. पादेल्फोर्द यांच्या मतानुसार परराष्ट्र धोरणात राष्ट्र राज्याची राजकीय उद्दिष्ट्ये, नैतिक तत्वे आणि राष्ट्रहिताची परिभाषा यांचा समावेश होतो. पादेल्फोर्द आणि लिंकन यांच्यानुसार "परराष्ट्र धोरण म्हणजे राष्ट्र राज्याचे बाह्य घटकांशी संबंधित सर्वांगीण व्यवहार वर्तन, राष्ट्र राज्याच्या व्यापक ध्येय आणि हितांचे रक्षण आणि प्राप्तीसाठी इतर राष्ट्रांप्रती अंमलात आणलेल्या विशिष्ट प्रक्रियांचा संच म्हणजे परराष्ट्र धोरण होय."

**परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये:-**

परराष्ट्र धोरणाची काही उद्दिष्ट्ये निर्धारित केली आहेत जी जवळपास सर्वच देशांना लागू होतात.

1. देशाच्या एकात्मतेचे आणि अखंडतेचे रक्षण करण्याचे काम परराष्ट्र धोरण पार पाडत असते.
2. आपल्या देशातील परदेशी नागरिकांच्या हिताचे रक्षण करणे.
3. बाहेर देशातून स्थलांतरित स्थायिक झालेल्या लोकांच्या सांस्कृतिक मुल्यंचे जतन करणे.
4. विविध देशांबरोबर आर्थिक व तंत्रविषयक देवाणघेवाण करण्याचे काम परराष्ट्र धोरण निच्छित करतो.

अशाप्रकारे परराष्ट्र धोरणाचे वेगवेगळे उद्दिष्ट्ये असू शकतात. संबंधित देशातील परिस्थिती पाहून त्या देशातील परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये असू शकतात.

**भारतीय परराष्ट्र धोरण आणि वर्तमान स्थिती:-**

नव्या जागतिक जडणघडणीत भारताला अधिक व्यापक भूमिका आणि जबाबदारी घ्यावी लागणार आहे. त्यासाठी भारताने पारंपारिक व आदर्शवादी विचारांच्या बंधनातून बाहेर पडून वास्तववादी धोरणाचा अवलंब करणे गरजेचे आहे. आजच्या घडीला कोविड-१९ च्या महासाथीमुळे झालेलं नुकसान भरून काढण्यासाठी जागतिक स्तरावर होत असलेले सहकार्य, लडाखमध्ये चीनबरोबर नव्याने उफाळलेला संघर्ष, चीनला अटकाव करण्यासाठी 'क्वाड' गटाच्या स्थापनेला आलेली गती, अमेरिकेशी भारताने केलेला 'बेका' करार, अमेरिकेत नुकत्याच पार पडलेल्या अध्यक्षीय निवडणुकीत जोसेफ बायडन यांचा झालेला विजय या मुळे जागतिक राजकारणात परराष्ट्र धोरणाविषयी वेगवेगळ्या चर्चा रंगू लागल्या आहेत.

स्वातंत्र्यापूर्वी साधारण २०० वर्षे भारत ब्रिटिशांच्या आणि त्यापूर्वी अनेक शतके अन्य राजवटींच्या गुलामगिरीत असल्याने स्वतंत्र परराष्ट्र धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी करू शकला नव्हता. सार्वभौम राष्ट्र म्हणून भारताचे अस्तित्व १९४७ सालापासून सुरू झाले. देशाची अखंडता, एकात्मता, सुरक्षितता सुनिश्चित करणे हे कोणत्याही केंद्रीय शासनव्यवस्थेचे आद्य कर्तव्य आहे. आपल्या देशातील नागरिकांच्या मुलभूत गरजा पूर्ण करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुयोग्य नियोजन करून अनुकूल वातावरण निर्मितीची गरज आहे. भारतीय जनमानसात राष्ट्र या संकल्पनेचे आकलन केल्यानंतर लक्षात येते कि, प्राचीन भारतीय संस्कृतीच्या विचारांचा मोठा पगडा त्यांच्या विचारावर आहे. पूर्वी आध्यात्मिकतेचा पगडा असलेली भारतीय संस्कृती परकीय आक्रमण आणि नियंत्रणाने लयाला गेली. तिची सर्व बाजूंनी लुट करण्यात आली. शतकानुशतके परकियांच्या जोखडातून १९४७ साली बाहेर आल्यानंतर या महान संस्कृतीच्या पुनरुत्थानाच्या प्रक्रीयला सुरुवात झाली आणि आपल्या अंगभूत क्षमतांमुळे हि संस्कृती यथावकास आपसूकच जागतिक मंचावर आपले अपेक्षित स्थान मिळवेल, अशा भाबड्या आशावादात भारतीय

परराष्ट्र व्यवहाराची पायाभरणी झाली. आजही या कल्पनेतून आपण पुरते बाहेर आलेलो नाही.

स्वातंत्र्यानंतर सलग १७ वर्षे जवाहरलाल नेहरू यांनी पंतप्रधानपद आणि परराष्ट्र व्यवहार सांभाळले. एकीकडे स्वतंत्र भारतात पायाभूत सोयी-सुविधा आणि संस्था निर्माण करून त्या बळकट करण्याचे श्रेय नेहरूंना जाते. पण परराष्ट्र व्यवहाराच्या बाबतीत हा काळ विरोधाभासांचा होता. स्वातंत्र्य चळवळीवर महात्मा गांधी यांचा बराचसा पगडा असल्याने त्यावेळी आणि त्यानंतरच्या काळात भारतीय नेतृत्वावर शांतता, सहिष्णुता, अहिंसा, नीतीमत्ता या आदर्शवादी कल्पनांचा अतिरेकी प्रभाव होता. त्यामुळे नेहरूंनीही शांतता आणि नीतीमत्ता या तत्वांचा परराष्ट्र धोरणात अनाठायी वापर केला. त्याने वास्तवाकडे दुर्लक्ष झाले. केंद्रात २०१४ साली नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार अस्तित्वात आल्यानंतर परराष्ट्र व्यवहारांत थोडे नवचैतन्य आल्याचे दिसले खरे, मात्र लवकरच या बाबतीत भ्रमनिरास झालेला जाणवले. मोदी यांनी त्यांच्या शपथविधीसाठी शेजारी देशांच्या नेत्यांना आमंत्रित केले होते. पण त्यातील सकारात्मकता पाकिस्तानच्या दहशतवादी हल्ल्यांनी नष्ट केली. मोदींनी पंतप्रधान म्हणून पहिला अधिकृत दौरा केला तो नेपाळचा. पण आज तोच नेपाळ चीनच्या कह्यात जाऊन भारतीय भूप्रदेशावर हक्क सांगत आहे.

बांगलादेश, म्यानमार, श्रीलंका, मालदीव या देशांत चीनचा प्रभाव वाढत आहे. नेहरूंच्या काळात परराष्ट्र व्यवहारांत जसा त्यांच्या वैयक्तिक करिष्म्याचा वाटा होता तसाच मोदीही निर्माण करू पाहत आहेत. पण या दोघांनाही त्यात अपयश आल्याचे दिसते. मोदींनी परदेशी नेत्यांच्या भेटीत उठसूट त्यांना मिठ्या मारल्या. याने प्रसारमाध्यमांना खुसखुशीत खाद्य मिळत असले तरी परराष्ट्र धोरणाला काही पोषण मिळत नाही, हे दिसून आले आहे. ट्रम्प यांना मिठ्या मारूनही त्यांनी व्हिसा धोरणात भारताला फटका दिला. अमेरिकेच्या अधिक जवळ जाताना भारताला इराणसारखा मित्र दुखवावा लागत आहे. तेथून होणारा खनिज तेलपुरवठा बंद झाला आहे आणि तेथील चाबहारसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांचे भवितव्य अनिश्चित झाले आहे. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनाही मोदींना झोपाळ्यावर बसवून अलिंगन दिले. पण त्याच वेळी चीन लडाखमध्ये घुसखोरी करत होता. त्यामुळे चीनबाबत नेहरूंप्रमाणेच मोदींनीही हात पोळून घेतले आहेत. लडाखमध्ये झालेली चूक निस्तरण्यासाठी आता कितीही प्रयत्न केले तरी झालेले नुकसान भरून येत नाही. अमेरिकेच्या अधिक जवळ जाण्याने रशियाही भारतावर नाराज होत आहे. रशियाने आता पाकिस्तानला शस्त्रपुरवठा सुरू केला आहे. तसेच तो चीनच्या अधिक जवळ जात आहे. गेल्या काही वर्षांत भारताचे परराष्ट्र धोरण काहीसे वास्तववादी होताना दिसते. इतकी वर्षे इस्रायलशी चांगले संबंध असूनही तेलपुरवठादार अरब देशांना नाखुश करावे लागू नये म्हणून भारताने इस्रायलच्या संबंधांना अधिकृत मान्यता दिली नव्हती. ती आता देण्यात आली. हे थोडे वास्तवात येण्याचे लक्षण. मात्र, परराष्ट्र धोरणातील कल्पनाविलास अद्याप पूर्णपणे संपलेला नाही. अलिप्तवादाची जागा आता 'स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी'ने (व्यूहात्मक स्वायत्तता) घेतली आहे. म्हणजे सामरीक किंवा व्यूहात्मक निर्णय घेताना अन्य देशांचा दबाव येऊ न देता स्वायत्तपणे निर्णय घेणे. पण, देश जोपर्यंत आर्थिक, औद्योगिक, संरक्षण, संशोधन आणि ऊर्जा आदी क्षेत्रांत स्वयंपूर्ण बनत नाही, तोपर्यंत 'स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी' या संकल्पनेला काही अर्थ नाही. तिच गोष्ट 'सॉफ्ट पॉवर' किंवा 'सौम्यशक्ती'ची. जगात योगसाधनेविषयी कुतुहल वाढले, भारतीय चित्रपट लोकप्रिय होऊ लागले, इडली-वडा अशा दोन-चार भारतीय पदार्थांची नावे ऑक्सफर्ड शब्दकोशात सामील झाली म्हणजे भारताचे युग अवतरले, असे मानण्याची रीत आजकाल पाहावयास मिळते. एकंदर परराष्ट्र व्यवहारात या बाबींचे महत्त्व मर्यादित आहे, हे समजून घेतले पाहिजे. परराष्ट्र धोरण हे मूलतः आर्थिक-व्यापारी आणि संरक्षणविषयक हितसंबंधांतून आकाराला येत असते. या दोन्ही आघाड्यांवर आज भारत निर्णायक वळणांवर उभा आहे. या संदर्भात भारत आता जे निर्णय घेतो त्यावर त्याचे बऱ्याच अंशी भवितव्य अवलंबून असणार आहे. "अलीकडील काळ हा राजकीय साम्राज्यवादाचा नसून आर्थिक साम्राज्यवादाचा आहे जेव्हा भारताचे जागतिक व्यापार संघटनेत महासत्तांच्या आर्थिक साम्राज्यवादी धोरणासाठी तीव्र विरोध केला आहे. यामुळे साम्राज्यवाद व वसाहतवादाला विरोध हे भारताचे परराष्ट्र धोरणाचे ठळक वैशिष्ट्ये ठरले आहे." तेव्हा, निर्णय घेताना तो विचारपूर्वक घेणे आणि एकदा निर्णय घेतला की, अनेक आघाड्यांवर युद्धपातळीवर कामाला लागणे, यावाचून गत्यंतर नाही. तसे करताना फुकाच्या आदर्शवादी

संकल्पनांच्या जोखडातून देशाला बाहेर काढण्याबरोबरच वास्तवाची कास धरणे, ही मोठी आव्हाने असणार आहेत.

**संगर्भ सूची**

१. *वी.एन. खन्ना, अंतर्राष्ट्रीय संबंध, विकास पब्लिशिंग हाउस, नई दिल्ली, २०१४. पृ.- ४९५*

२. *Norman J Padelford and George A Lincoln, The Dynamics of International Politics, The Macmillan Company, New York, 1962. P.195*

३. *गाडगीळ, नवभारताचे शिल्पकार- पंडित जवाहरलाल नेहरू, शकला प्रकाशन, मुंबई, १९९४. पृ.- २२७-२५०*

४. *शिंदे ज. रा. भारताचे परराष्ट्रीये धोरण, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९२.*